नसे भय पराजयाच
विजयाचे आम्हा
वेड लुटूनी सोने
आनंदाचे रोविती
प्रेमाची मुहूर्तमेढ
दसऱ्याच्या
हार्दिक शुभेच्छा !

लढणारा
महाराष्ट्राचा मानबिंदू मराठी दैनिक
# कलमवीर
मुख्य संपादक : पंडित दौं. तिडके

**सुट्टीची सूचना**
मंगळवार दिनांक २० ऑक्टोबर २०२६ रोजी विजयादशमी निमित्त दैनिक लढणारा कलमवीर कार्यालयास सुट्टी राहील त्यामुळे दिनांक २१ ऑक्टोबर २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचकांनी नोंद घ्यावी – व्यवस्थापक

अंक : ९६ वा • मंगळवार दि.२० ऑक्टोबर २०२६ • मुल्य २.०० रू • पाने : ०४ • RNI No. MHMAR/25/A0558 • news.kalamveer@gmail.com •


# महाराष्ट्राच्या सहा युवा कलावंतांचा राष्ट्रीय गौरव!

## ‘उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार’ प्रदान; विविध कलापरंपरांतील योगदानाचा सन्मान

**मुंबई दैनिक कलमवीर ब्युरो**

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशातील विविध कलापरंपरांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला असून, राज्यातील सहा युवा कलावंतांना संगीत नाटक अकादमीच्या प्रतिष्ठित ‘उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां’ने सन्मानित करण्यात आले. शास्त्रीय संगीतापासून पारंपरिक लोककलांपर्यंत विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या या कलावंतांच्या सन्मानामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला राष्ट्रीय व्यासपीठावर नवी ओळख मिळाली आहे.

केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते नवी दिल्लीतील रवींद्र भवन परिसरातील मेघदूत थिएटर कॉम्प्लेक्स येथे झालेल्या समारंभात २०२४ आणि २०२५ या वर्षांसाठी देशभरातील एकूण १०६ युवा कलावंतांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**महाराष्ट्रातील सहा पुरस्कारार्थी कलावंत**

कृष्णा बोंगाणे आणि अंकिता जोशी यांना हिंदुस्तानी शास्त्रीय गायनातील योगदानाबद्दल २०२४ चा संयुक्त युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पारंपरिक बहुरूपी भारूड या लोककलाप्रकाराच्या संवर्धनासाठी डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे यांना, तर पारंपरिक कलासूत्री बाहुलीनाट्य कलेच्या जतन व संवर्धनासाठी बालकृष्ण (कृष्णा) गणपत मसगे यांना याच वर्षीच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

२०२५ च्या पुरस्कारांमध्ये तन्मय देवचके यांना हार्मोनियम वादनातील योगदानाबद्दल, तर प्रवीण प्रताप जाधव यांना शाहिरी, पोवाडा आणि लोकगीतांचा अभ्यास, संशोधन व प्रसार यांसाठी सन्मानित करण्यात आले. तन्मय देवचके हे पुरस्कार वितरण समारंभास उपस्थित नव्हते.

**युवा प्रतिभेला प्रोत्साहन, पारंपरिक कलांचे संवर्धन**

‘उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार’अंतर्गत प्रत्येकी




२५ हजार रुपये रोख, ताम्रपट आणि अंगवस्त्र देऊन कलावंतांचा सन्मान करण्यात येतो. युवा प्रतिभेला प्रोत्साहन देणे, पारंपरिक कलांचे जतन व संवर्धन करणे आणि भारतीय कला-संस्कृतीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या पुरस्कारांचा प्रमुख उद्देश आहे.महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख शास्त्रीय संगीत, संतपरंपरेशी निगडित लोककला, भारूड, शाहिरी, पोवाडा आणि पारंपरिक सादरीकरणांच्या समृद्ध संगमातून घडली आहे. या कला केवळ मनोरंजनाची साधने नसून त्या समाजाचा इतिहास, लोकजीवन, विचारविश्व आणि सांस्कृतिक अस्मिता जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यामुळे सहा युवा कलावंतांना मिळालेला हा सन्मान महाराष्ट्राच्या विविधांगी कलाविश्वातील योगदानाची राष्ट्रीय पातळीवर घेतलेली दखल ठरतो.

**पुरस्कार वितरण सोहळ्यातील मान्यवर**

या समारंभास केंद्रीय संस्कृती मंत्रालयाचे सचिव विवेक अग्रवाल, संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा, अकादमीचे उपाध्यक्ष अनवर खान मांगणियार आणि सचिव राजू दास उपस्थित होते.

# अंढेरा पोलिसांचा अवैध रेती वाहतुकीवर प्रहार

## ९९ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त; पाच टिप्पर ताब्यात, पाच जणांविरुद्ध गुन्हा

**देऊळगाव राजा । देवानंद झोटे**

बुलढाणा जिल्ह्यात अवैध रेती वाहतुकीविरोधात अंढेरा पोलिसांनी मोठी कारवाई करत पाच टिप्पर जप्त केले. या कारवाईत १८ ब्रास रेतीसह एकूण ९९ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास अंढेरा फाटा येथे करण्यात आली.पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन ठोसरे यांच्या सूचनेनुसार, सहायक पोलीस निरीक्षक रुपेश शक्करगे यांच्या मार्गदर्शनाखाली अंढेरा पोलिसांचे पथक अवैध धंद्यांविरोधात कारवाई करत होते.दरम्यान, देऊळगाव महीकडून अंढेरा फाट्याच्या दिशेने अवैध रेती वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी नाकाबंदी केली. यावेळी रेतीने भरलेले पाच टिप्पर आढळले. वाहनचालकांकडे वाहतुकीचा परवाना मागितला असता तो उपलब्ध नसल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांनी पाचही टिप्पर जप्त केले.जप्त



वाहनांमध्ये तीन अशोक लेलँड आणि दोन टाटा टिप्परचा समावेश आहे. वाहनांची एकूण किंमत ९८ लाख ५० हजार रुपये, तर १८ ब्रास रेतीची किंमत एक लाख आठ हजार रुपये आहे. अशा प्रकारे एकूण ९९ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल सिद्धार्थ सोनकांबळे यांच्या तक्रारीवरून अंढेरा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३४६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) तसेच गौण खनिज अधिनियमाच्या कलम २१(१) आणि २१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाईत जीवन महादू वाघ (वय १९), गणेश दिलीप इंगळे (वय २२), अनिकेत गजानन घोरपडे (वय २१), विजय रंगनाथ तारू (वय ४०) आणि पवन विजय इंगळे (वय २२) या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी चौघे भानखेड, ता. चिखली येथील, तर अनिकेत घोरपडे हा संभाजीनगर, चिखली येथील रहिवासी असल्याचे पोलिसांच्या प्रसिद्धिपत्रकात नमूद आहे.ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक रुपेश शक्करगे, पोलीस उपनिरीक्षक दिनेश घुगे, पोलीस हेड कॉन्स्टेबल सिद्धार्थ सोनकांबळे, पोलीस कॉन्स्टेबल नितीन वाघ आणि पोलीस कॉन्स्टेबल श्रीकांत पव्हरे यांच्या पथकाने केली.

# खोट्या हरकतींद्वारे मतदारांची नावे वगळण्याचे प्रयत्न रोखा

## SIR प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्याची रिसोड तालुका काँग्रेसची मागणी

**रिसोड । सतीश चोपडे**

वृत्त सखोल मतदार यादी पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेदरम्यान खोट्या हरकती दाखल करून पात्र मतदारांची नावे वगळण्याचे कथित प्रयत्न रोखावेत, अशी मागणी रिसोड तालुका काँग्रेस कमिटीने केली आहे. यासंदर्भात १९ ऑक्टोबर रोजी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, काही ठिकाणी ठोस आधार नसताना मतदारांच्या नावांवर हरकती घेतल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच, बनावट नावे किंवा खोट्या ओळखींचा वापर करून फॉर्म क्रमांक ७ दाखल करत पात्र मतदारांची नावे वगळण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारांमुळे नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर गदा येण्याची शक्यता असून, निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरही प्रश्न निर्माण होऊ शकतात.



खोट्या व निराधार हरकतींची तातडीने चौकशी करावी, फॉर्म क्रमांक ७ द्वारे दाखल हरकतींची सखोल पडताळणी करावी आणि जाणीवपूर्वक गैरप्रकार करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मतदाराचे नाव वगळण्यापूर्वी निष्पक्ष पडताळणी करून संबंधिताला बाजू मांडण्याची पुरेशी संधी द्यावी, तसेच जिल्हा व तालुका स्तरावर प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करावी, असेही निवेदनात नमूद आहे.

संबंधित मतदान केंद्रांवरील मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (BLA-1) आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडञ) यांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावेत. पात्र मतदारांची नावे अनधिकृतपणे वगळली जाणार नाहीत, याची दक्षता घेऊन प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी काँग्रेस कमिटीने केली आहे.

यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रामेश्वर देवकर, शहराध्यक्ष अकबर बागवान, प्रसाद गांजरे, नगरसेवक बंडू वानखेडे, विजय रंजवे, नगरसेवक अकबर खान, बबनराव गारडे, बाबाराव पाटील ढोणे, नगरसेवक सिकंदर खान, बबनराव सानप, मो. फैज, माया मोरे, शेख अजीज, रोहित दोदडे, शेख समीर, राजू खांबलकर, अश्विन तुरूकमाने, इमरान खान, दीपक हरकळ यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सेनगावात दुष्काळी उपाययोजनांना गती द्या

## प्रत्येक ग्रामपंचायतीत १०० जलतारांचे उद्दिष्ट; दर बुधवारी आढावा

**सेनगाव दैनिक कलमवीर ब्युरो**

संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात पाणी व चारा टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करून उपाययोजनांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.सेनगाव येथे ग्रामपंचायत अधिकारी व तलाठी यांच्या संयुक्त आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी गावनिहाय पाणीटंचाई, चाऱ्याची उपलब्धता आणि दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.

**प्रत्येक ग्रामपंचायतीत १०० जलतारांचे उद्दिष्ट**

प्रत्येक ग्रामपंचायतीने किमान १०० जलतारांची निर्मिती करण्यासाठी नियोजन करावे. जलसंवर्धनाच्या कामांना प्राधान्य देऊन पावसाचे पाणी जमिनीत जिरवावे. पशुधनासाठी चारा उपलब्धता वाढविण्याकरिता कुरण लागवडीला प्रोत्साहन द्यावे. जिल्ह्याबाहेर चारा वाहून नेण्यावरील बंदीची अंमलबजावणी करावी आणि तलावांतील पाण्याचा अनधिकृत उपसा रोखावा, असे निर्देश




जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

**ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीटंचाई निवारणाचे नियोजन**

ऑगस्ट २०२७ पर्यंत तालुक्यात पाणीटंचाई उद्भवू नये, यासाठी जलसाठ्यांचे संरक्षण, जलसंवर्धन आणि पाणीपुरवठ्याचे दीर्घकालीन नियोजन करावे. संभाव्य टंचाईग्रस्त गावांमध्ये उपाययोजना वेळेत पूर्ण करून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची अडचण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

**गैरहजरांवर कारवाईचा इशारा**

ग्रामस्तरावरील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची दर बुधवारी बैठक घेऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा व अहवाल सादर करावा. बैठकीला गैरहजर राहणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.

**जलसंवर्धनाला प्राधान्य द्या**

‘विकसित भारत ग्रामीण रोजगार व उपजीविका मिशन’अंतर्गत जलतारा निर्मिती व जलसंवर्धनाची कामे प्राधान्याने प्रस्तावित करावीत. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर, जलस्रोतांचे संरक्षण आणि विभागांमधील समन्वयातून कृत्रिम पाणीटंचाई टाळावी, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक **गायकवाड यांनी सांगितले.**

बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, कार्यकारी अभियंता अतुल सोळंके, तहसीलदार सखाराम मांडवगडे, गटविकास अधिकारी सुरेश कांबळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या तपासणीचे आयुक्तांचे निर्देश

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून हिंगोलीत आरोग्य केंद्रांची पाहणी



**हिंगोली दैनिक कलमवीर ब्युरो**

नागरिकांना शासकीय आरोग्य संस्थांमधून वेळेत दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील सुविधांचा दर्जा उंचावावा, यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आरोग्य व कुटुंब कल्याण आयुक्त संजय काटकर यांनी राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रांची प्रत्यक्ष तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

आयुक्त काटकर यांच्या निर्देशानुसार १७ ते १९ ऑक्टोबरदरम्यान राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देऊन दैनंदिन कामकाज आणि अभिलेखांची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

या निर्देशांची अंमलबजावणी करत हिंगोलीचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. राहुल गीते आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र पुरी यांनी शनिवार ते सोमवार या कालावधीत जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या. यावेळी आरोग्य सेवांचा दर्जा, उपलब्ध सोयी-सुविधा आणि दैनंदिन कामकाजाची पाहणी करण्यात आली.

या तपासणीदरम्यान बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभागातील उपचार व्यवस्था, औषधसाठा व वितरण, प्रसूती कक्षातील स्वच्छता आणि सुरक्षितता, तसेच शस्त्रक्रियागृहाची सज्जता यांचा आढावा घेण्यात आला. प्रयोगशाळेतील वैद्यकीय चाचण्या आणि तपासणी अहवालांची स्थितीही तपासण्यात आली.याशिवाय, आरोग्य केंद्रांतील कर्मचाऱ्यांची उपस्थिती, ऑनलाइन व ऑफलाइन नोंदवह्या आणि दैनंदिन कामकाजाच्या अभिलेखांची पडताळणी करण्यात येत आहे. या पाहणीमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रांतील सेवा आणि सुविधांची सद्यस्थिती स्पष्ट होऊन आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यास मदत होणार आहे.

# सोनं लुटायचं की दुष्काळाशी झुंजायचं?

आज विजयादशमी! घराघरांत आनंदाचे वातावरण असेल. आपट्याची पाने सोनं म्हणून लुटली जातील, एकमेकांना शुभेच्छा दिल्या जातील आणि सुख–समृद्धीच्या कामना केल्या जातील. वाईटावर चांगल्याच्या विजयाचा संदेश देणारा हा सण महाराष्ट्राच्या संस्कृतीत मानाचे स्थान राखून आहे. मात्र, यंदा या उत्सवाच्या उंबरठ्यावर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा आहे–एका बाजूला सोनं लुटण्याचा उत्सव, तर दुसऱ्या बाजूला पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी संघर्ष! अशा परिस्थितीत सणाचा आनंद साजरा करताना तहानलेल्या गावांचा, चिंताग्रस्त शेतकऱ्यांचा आणि पाणीटंचाईच्या सावटाखाली जगणाऱ्या ग्रामीण महाराष्ट्राचा विसर पडता कामा नये. हा केवळ पावसाचा प्रश्न नाही, व्यवस्थेच्या नियोजनाचीही कसोटी आहे! महाराष्ट्रात पावसाचे वितरण सर्वत्र सारखे नसते. काही भागांत समाधानकारक पाऊस पडतो, तर काही भागांत पावसाची तूट, पिकांची चिंता आणि पाणीटंचाईचे संकट निर्माण होते. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीचे अर्थकारण आधीच अनिश्चिततेच्या भोवऱ्यात असताना पाण्याची उपलब्धता कमी होण्याची भीती शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालते.

परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या येलदरी आणि सिद्धेश्वर धरणांची उपलब्ध आकडेवारी या चिंतेची पार्श्वभूमी स्पष्ट करते.ऑक्टोबरच्या नोंदीनुसार, येलदरी धरणात ६१.०५ टक्के, तर सिद्धेश्वर धरणात केवळ २९.६३ टक्के जिवंत पाणीसाठा आहे. दोन्ही धरणांतील पाण्याची आवक थांबल्याची नोंद करण्यात आली. हे आकडे त्या दिवसाचे असले, तरी त्यातून पाणीसाठ्याच्या नियोजनाचे महत्त्व अधोरेखित होते. सध्याचा साठा आणखी कमी झाला असल्यास परिस्थितीचे अद्ययावत मूल्यमापन करणे अधिक आवश्यक ठरते. धरणात किती पाणी आहे, हा प्रश्न महत्त्वाचा आहेच; पण उपलब्ध पाणी किती दिवस पुरणार, कोणत्या गरजांना प्राधान्य द्यायचे आणि संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी कोणती तयारी केली आहे, हे प्रश्न त्याहून महत्त्वाचे आहेत. प्रश्न पावसाचा आहेच; पण उत्तरदायित्वाचे काय? पाऊस आपल्या हातात नाही, हे वास्तव आहे. मात्र, पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे, जलस्रोतांचे संवर्धन करणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आपल्या हातात आहे. मग पाणीटंचाईची शक्यता निर्माण होत असताना प्रशासनाचे नियोजन किती प्रभावी आहे? संभाव्य टंचाईग्रस्त गावांची यादी तयार आहे का? पिण्याच्या पाण्याचे पर्यायी स्रोत निश्चित केले आहेत का? गरज भासल्यास टँकर, विहिरींचे अधिग्रहण आणि इतर उपाययोजनांची तयारी आहे का? हे प्रश्न विचारणे म्हणजे शासनाला विरोध करणे नव्हे; तर लोकशाहीत जनतेच्या हितासाठी आवश्यक असलेले उत्तरदायित्व मागणे होय. दुष्काळाचे संकट तीव्र झाल्यानंतर बैठका, पाहणी दौरे आणि आश्वासनांचा उपयोग मर्यादित असतो. संकटाची चाहूल लागताच कृती आराखडा तयार होणे, त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आणि मदत प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. कागदावरील नियोजनापेक्षा तहानलेल्या गावातील नळाला येणारे पाणी आणि शेतकऱ्याच्या शेतातील ओलावा हेच प्रशासनाच्या कामगिरीचे खरे मोजमाप असले पाहिजे.

**रोखठोक**

बळीराजाच्या वेदना उत्सवाच्या गोंगाटात हरवू नयेत! शेतकरी केवळ अन्नधान्य पिकवत नाही; तो संपूर्ण समाजाच्या जगण्याचा आधार उभा करतो. पाणी कमी पडले, पिकांचे नुकसान झाले किंवा उत्पादनाबाबत अनिश्चितता निर्माण झाली, तर त्याचा परिणाम शेतकऱ्याच्या कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही. शेतमजुरांचा रोजगार, गावातील व्यवहार, पशुधनाची देखभाल आणि ग्रामीण बाजारपेठेची उलाढाल या सगळ्यांवर त्याचे परिणाम होतात. अशा वेळी शेतकऱ्याला केवळ धीर देऊन चालणार नाही. परिस्थितीनुसार नुकसानभरपाई, पीकविमा, रोजगाराच्या संधी, जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था याबाबत शासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत. मदतीचे निकष पारदर्शक असावेत आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत मदत वेळेत पोहोचली पाहिजे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर राजकीय श्रेयवाद रंगविण्यापेक्षा त्यांना दिलासा देण्यासाठी एकत्र येणे अधिक आवश्यक आहे. संकटाच्या काळात जनतेला घोषणांची नव्हे, तर कृतीची गरज असते.

रावणदहनाबरोबर निष्काळजीपणाचेही दहन करा! विजयादशमीला आपण रावणदहन करतो. पण समाजाला पोखरणाऱ्या निष्काळजीपणा, पाण्याचा अपव्यय, अनियोजित विकास आणि सामूहिक जबाबदारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या वृत्तींचे काय? पाणी ही केवळ शासनाची किंवा एखाद्या विभागाची जबाबदारी नाही. प्रत्येक नागरिकानेही पाण्याचा वापर जपून केला पाहिजे. पावसाचे पाणी साठवणे, जलसंधारणाच्या कामांत सहभाग घेणे, स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि पाण्याची नासाडी रोखणे, ही काळाची गरज आहे. त्याच वेळी, नागरिकांवर जबाबदारी टाकून शासनाला आपल्या कर्तव्यापासून दूर जाता येणार नाही. दीर्घकालीन जलनियोजन, पाणलोट क्षेत्र विकास, भूजल पुनर्भरण, स्थानिक परिस्थितीनुसार पीक नियोजन आणि उपलब्ध साठ्याचा काटेकोर हिशेब या उपाययोजनांना सातत्य मिळाले पाहिजे. पाणीटंचाई ही दरवर्षी नव्याने उद्भवणारी समस्या न राहता तिचा धोका कमी करण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. लढणाऱ्या लेखणीचा सवाल! दैनिक 'लढणारा कलमवीर'ची लेखणी केवळ उत्सवाचे वर्णन करण्यासाठी नाही; तर जनतेच्या वेदनांना आवाज देण्यासाठी, व्यवस्थेला प्रश्न विचारण्यासाठी आणि अन्यायाविरुद्ध भूमिका मांडण्यासाठी आहे. म्हणूनच विजयादशमीच्या या क्षणी एक प्रश्न ठामपणे विचारावासा वाटतो–महाराष्ट्रातील प्रत्येक गावाला पिण्याचे सुरक्षित पाणी, शेतकऱ्याला शेतीसाठी उपलब्ध जलस्रोतांचा न्याय्य लाभ आणि संकटाच्या काळात वेळेवर मदत मिळावी, यासाठी पुरेशी तयारी केली आहे का? या प्रश्नाचे उत्तर भाषणांतून नव्हे, तर प्रत्यक्ष कामातून मिळाले पाहिजे. दुष्काळाची तीव्रता वाढल्यानंतर जागे होणाऱ्या व्यवस्थेपेक्षा संकट येण्यापूर्वी सज्ज असलेली व्यवस्था जनतेच्या अधिक उपयोगाची ठरते. पाण्याचे नियोजन ही केवळ एका हंगामाची गरज नसून महाराष्ट्राच्या भविष्यासाठीची अनिवार्य जबाबदारी आहे.उद्या आपट्याची पाने सोनं म्हणून लुटली जातील. पण त्या सोन्याच्या प्रतीकात्मक देवाणघेवाणीपलीकडे जाऊन शेतकऱ्याच्या घरात समृद्धी, गावात पाणी आणि ग्रामीण जनतेच्या मनात भविष्याबद्दल विश्वास निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे.कारण विजयादशमीचा खरा अर्थ केवळ रावणदहनात नाही; तर जनतेच्या संकटांवर मात करण्यात आहे. तहानलेल्या महाराष्ट्राला पाणी, बळीराजाला आधार आणि व्यवस्थेला उत्तरदायित्व मिळवून देणे, हाच यंदाच्या विजयादशमीचा खरा संकल्प ठरला पाहिजे!

– पंडीत दौ. तिडके,मुख्य संपादक, दैनिक कलमवीर

# कोसगावच्या डॉ.शुभम पायघन यांची एमडी पदवी

## रेडिओ डायग्नोसिसमध्ये यश; सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

**भोकरदन । सुनील उंबरकर**

भोकरदन तालुक्यातील कोसगाव येथील डॉ. शुभम प्रल्हाद पायघन यांनी वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत एमडी (रेडिओ डायग्नोसिस) ही पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या या यशामुळे कोसगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, गावासह परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



डॉ. शुभम यांचे वडील प्रल्हाद पायघन हे बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथील मृद व जलसंधारण उपविभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर कार्यरत होते. ते ३१ जानेवारी २०२६ रोजी शासकीय सेवेतून निवृत्त झाले.

डॉ. शुभम यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून ही उच्च पदवी संपादन केली. त्यांच्या यशामुळे पायघन परिवाराचा आनंद द्विगुणित झाला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास उच्च शिक्षणात यश मिळवता येते, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिले आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच त्यांच्या पुढील वैद्यकीय वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# 'लक्ष्मी रमण गोविंदा'च्या जयघोषात लाटामंडपोत्सव उत्साहात

## २१ महाकाय सागवानी लाटांची उभारणी; दसऱ्याच्या मध्यरात्री पालखी मिरवणूक

**देऊळगाव राजा । देवानंद झोटे**

वृत्त प्रतितिरुपती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देऊळगाव राजा येथील श्री बालाजी महाराजांचा वैशिष्ट्यपूर्ण लाटामंडपोत्सव सोमवार, रोजी 'बोल बालासाहेब की जय', 'लक्ष्मी रमण गोविंदा'च्या जयघोषात उत्साहात संपन्न झाला. घंटानाद, नगाऱ्यांचा गजर आणि 'गोविंदा गोविंदा'च्या घोषणांनी मंदिर परिसर भक्तिमय झाला.



**२१ महाकाय सागवानी लाटांची उभारणी**

भाविक, मानकरी व समाजबांधवांच्या उपस्थितीत ४२ मंडपांना दोर बांधून दीड फूट व्यासाच्या आणि ३२ फूट उंचीच्या २१ महाकाय सागवानी लाटांची उभारणी करण्यात आली. महाद्वाराशेजारील हनुमानाच्या प्राचीन दगडी मूर्तीला तसेच संस्थानसमोरील गरुडाच्या दगडी मूर्तीला अखंड दोर बांधून लाटामंडप उभारण्यात आला. उत्सवानंतर संस्थानच्या वतीने मानकऱ्यांना प्रसाद वितरित करण्यात आला.

**दसऱ्याला मध्यरात्री पालखी मिरवणूक**

मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी दसऱ्याच्या मध्यरात्री १२ वाजता श्रींची पालखी मिरवणूक निघणार आहे. बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी पालखी संपूर्ण शहराला प्रदक्षिणा घालून मंदिरात विराजमान होईल. गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.४५ वाजता लळित उत्सव संपन्न होणार आहे.

**देणगीसाठी स्वतंत्र क्यूआर कोड**

भाविकांना कानगी व शाश्वत अन्नदानासाठी देणगी देता यावी, यासाठी संस्थानने स्वतंत्र क्यूआर कोड उपलब्ध करून दिले आहेत. श्रींच्या उत्सवात सहभागी होऊन दर्शन, प्रसाद व यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री बालाजी संस्थानचे वंशपरंपरागत विश्वस्त राजे विजयसिंह जाधव आणि व्यवस्थापक किशोर बीडकर यांनी केले आहे.

# शेतातील तारांचे कुंपण तोडून ७० हजारांचे नुकसान

## जमिनीच्या वादातून प्रकार; परभणीतील सुरेंद्र भाटियासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**जिंतूर । अशोक भालेराव**

शेतजमिनीच्या वादातून शेतातील तारांचे कुंपण तोडून अंदाजे ७० हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी परभणी येथील सुरेंद्र गेंदमल भाटिया यांच्यासह तिघांविरुद्ध जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, जिंतूर शिवारातील गट क्रमांक ११९/अ/२ मधील शेतात गाईंसाठी वैरणीची व्यवस्था करण्याचे काम सुरू होते. याचदरम्यान शेताच्या धुऱ्यावरील तारांचे कुंपण तोडण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेत सुमारे ७० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी शेतमालक सचिन भुजंगराव मोरे यांचे मुनीम कैलास वसंतराव सडाळ (रा. अकोली) यांनी जिंतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून सुरेंद्र गेंदमल भाटिया (रा. परभणी), जुनेद जमील अहमद (रा. जिंतूर) आणि अन्य एका अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ५९८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३२४(४) व ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हेमराज नेताम या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# वालसावंगीत चोरी रोखण्या साठी 'ग्रामसंरक्षण'चा निर्धार

## सीसीटीव्ही, रात्रीची प्रकाशव्यवस्था आणि सायबर सुरक्षेबाबत सपोनि सचिन खामगळ यांचे व्यापाऱ्यांना मार्गदर्शन

**भोकरदन । सुनील उंबरकर**

गावातील चोरीच्या घटना आणि संभाव्य गुन्हेगारीला आळा घालून सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी वालसावंगी ग्रामपंचायत येथे व्यापाऱ्यांची बैठक घेण्यात आली. पारध पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत ग्रामसंरक्षणासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले.



गावातील नागरिक, व्यापारी आणि मालमत्तेच्या सुरक्षेसाठी खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे सांगून सचिन खामगळ यांनी विविध उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. गावातील प्रमुख रस्ते आणि दुकानांच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, बँक परिसरात किंवा गावात संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, तसेच रात्रीच्या वेळी दुकाने आणि घरांसमोरील दिवे सुरू ठेवावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

व्यापाऱ्यांनी बँकेतून मोठी रोख रक्कम काढताना विशेष दक्षता घ्यावी, पशुधन मोकाट सोडू नये आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी सतर्क राहावे, असेही आवाहन करण्यात आले.वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर अनोळखी व्यक्तींकडून पाठविण्यात येणाऱ्या एपीके (–झघ) फाइल मोबाइलमध्ये डाउनलोड करू नयेत. तसेच सोशल मीडिया आणि डिजिटल खात्यांच्या सुरक्षिततेसाठी द्विस्तरीय पडताळणीचा वापर करावा, असे मार्गदर्शनही या वेळी करण्यात आले.

दरम्यान, ग्रामपंचायत कार्यालयात व्यापाऱ्यांच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीला गावातील लोकप्रतिनिधी, बँक व्यवस्थापक, छोटे–मोठे व्यापारी, ग्रामस्थ, पत्रकार आणि पोलीस कर्मचारी उपस्थित होते. गावातील शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी आणि चोरीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी सर्वांनी परस्पर समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# सतीश चव्हाण यांच्या विजया साठी प्रथम पसंतीचे मत द्या

## विकासकामे पुढे नेण्यासाठी विजयराव भांबळे यांचे मतदारांना आवाहन

**जिंतूर । अशोक भालेराव**

जिंतूर मतदारसंघातील विकासकामांची घोडदौड कायम ठेवण्यासाठी मतदारांनी मतपत्रिकेवरील अनुक्रमांक दोनसमोरील आमदार सतीश चव्हाण यांच्या नावासमोर प्रथम पसंतीचे मत नोंदवून त्यांना विजयी करावे, असे आवाहन माजी आमदार विजयराव भांबळे यांनी केले.



महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ शनिवारी जिंतूर येथील लक्ष्मी सेवा मंगल कार्यालयात मतदार व कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत विजयराव भांबळे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.आमदार सतीश चव्हाण गेल्या १५ वर्षांपासून मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असून, कामाचा धडाका आणि जनसंपर्क ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत, असे भांबळे यांनी सांगितले. मतदारसंघातील विकासकामांना अधिक गती देण्यासाठी चव्हाण यांना प्रथम पसंतीचे मत देऊन विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीला तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत, जिल्हा परिषद सदस्य माणिकराव हरकळ, शंकरराव जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वनाथ राठोड, बाळासाहेब घुगे, विठ्ठल घोगरे, पंचायत समिती सदस्य मुरलीधर मते, नंदकिशोर अंभोरे, अविनाश मस्के, मुजाहेब कौसडीकर, नगरसेवक अशोकराव बंड, करीम लाला, माजी पंचायत समिती सभापती मधुकर भवाळे, गणेशराव इलग, आसेफ भाई काझी, शौकत लाला, माधव घोगरे, आनंदराव खरात, हकीम लाला, खयुम कादरी, शाहेद सिद्धीकी, नारायण चौधरी आणि वसंतराव देशमुख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड पोलिसांची राज्यस्तरीय स्पर्धेत बाजी

## सात रौप्य पदके; श्वानपथकाचे सांघिक विजेतेपद

**हिंगोली । दैनिक कलमवीर ब्युरो**

२१ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०२६ मध्ये नांदेड परिक्षेत्रीय पोलीस संघाने सात रौप्य पदके मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. विशेष म्हणजे, श्वानपथक स्पर्धेत सांघिक विजेतेपद पटकावत नांदेड परिक्षेत्राने प्रथमच हा बहुमान मिळवला.५ ते १० ऑक्टोबरदरम्यान पुणे येथे आयोजित या स्पर्धेत संगणक जागरूकता विभागात लातूर घटकातील पोलीस हवालदार राजेश कंचे यांनी रौप्य पदक मिळवले. तर ट्रॅकिंग, एक्सप्लोजिव्ह आणि नार्कोटिक्स या तीन प्रकारांत श्वानपथकाने सहा रौप्य पदके पटकावली.



या यशात टायसन, बॉक्सर आणि सिम्बा या श्वानांसह त्यांचे हँडलर रामचंद्र जाधव, सादिक पठाण, सीता वाघमारे, सचिन तोटेवाड, मनोहर लोखंडे आणि माणिक मांडे यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. त्यांना वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच नांदेड येथील शैक्षणिक व न्यायवैज्ञानिक संस्थांतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

नांदेड येथील पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात पदकविजेत्या अधिकारी व अंमलदारांचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

अधिकारी व अंमलदारांच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि व्यावसायिक निष्ठेचे हे फलित असून, या यशामुळे नांदेड परिक्षेत्राच्या नावलौकिकात भर पडली आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सांगितले.

# दसऱ्याला विसावा कॉर्नरवर रोषणाई करा

## संजय कुलकर्णी यांचे मनपा आयुक्तांना निवेदन

**जिंतूर । अशोक भालेराव**

दसऱ्यानिमित्त सीमोल्लंघनासाठी पाथरी रोडवरील विसावा कॉर्नर येथे मोठ्या संख्येने नागरिकांची गर्दी होते. त्यामुळे या परिसरात पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी, तसेच नाल्याची तातडीने स्वच्छता करावी, अशी मागणी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर विसावा कॉर्नर येथे नागरिक सीमोल्लंघनासाठी येतात. यावेळी ब्रह्मवृंदांकडून आपट्याची पाने वाटप करण्यासह पूजाविधी केले जातात. त्यामुळे परिसरात मोठी वर्दळ असते. मात्र, अपुऱ्या प्रकाशव्यवस्थेमुळे नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. तसेच परिसरातील नाल्यातून दुर्गंधी पसरत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा आणि स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दसऱ्याच्या दिवशी नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी मनपा प्रशासनाने तातडीने विद्युत रोषणाईची व्यवस्था करावी आणि नाल्याची स्वच्छता करून परिसर स्वच्छ ठेवावा, अशी मागणी संजय कुलकर्णी यांनी निवेदनातून केली आहे.



# ‘वोट चोर, गद्दी छोड़’चा दिव्यात एल्गार!

## संविधान रक्षणासाठी काँग्रेसचा मोर्चा; राहुल पिंगळेंनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचा मुद्दा मांडला

**दिवा | अरविंद कोठारी**

‘वोट चोर, गद्दी छोड़’ आणि ‘संविधान वाचवा, लोकशाही वाचवा’ अशा घोषणांनी दिव्यात काँग्रेसच्या वतीने काढण्यात आलेल्या जनजागृती मोर्चाचे वातावरण दुमदुमले. मतदानाचा अधिकार, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि संविधानिक मूल्यांच्या संरक्षणाबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या देशव्यापी आंदोलनांतर्गत दिवा ब्लॉक काँग्रेस कमिटी आणि शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबविण्यात आले.

ठाणे शहर काँग्रेस अध्यक्ष राहुल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा रेल्वे स्थानक परिसरातून चंद्रगण टॉवरपर्यंत मोर्चा काढण्यात आला. या वेळी पादचारी, दुकानदार आणि भाजीविक्रेत्यांना जनजागृती पत्रकांचे वाटप करण्यात आले. मतदानाचे महत्त्व, संविधानातील अधिकार आणि लोकशाही व्यवस्थेत नागरिकांची भूमिका याविषयी माहिती देण्यात आली.




**मतदानाच्या अधिकाराबाबत जनजागृती**

अभियानादरम्यान भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२६ चे वाचन करून प्रौढ मताधिकाराचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी निष्पक्ष निवडणुका, पारदर्शक निवडणूक प्रक्रिया आणि मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण आवश्यक असल्याचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले.काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या कथित मतचोरीच्या मुद्द्याचा उल्लेख करत नागरिकांनी मतदानाच्या अधिकाराबाबत सजग राहावे, असे आवाहन करण्यात आले. संविधानाचे संरक्षण आणि लोकशाही संस्थांची स्वायत्तता टिकवून ठेवण्यासाठी जनजागृती आवश्यक असल्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली.

**पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित**

ठाणे शहर काँग्रेस अध्यक्ष राहुल पिंगळे यांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित करत केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका केली. पत्रकारांवर प्रशासकीय दबाव आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. स्वतंत्र आणि निर्भीड पत्रकारिता हा लोकशाहीचा महत्त्वाचा आधार असून, जनतेच्या समस्या आणि जनहिताचे प्रश्न मांडण्यासाठी प्रसारमाध्यमांना स्वातंत्र्य मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सहभाग**

या जनजागृती मोर्चात ठाणे शहर काँग्रेस अध्यक्ष राहुल पिंगळे, ठाणे काँग्रेस सेवादल अध्यक्ष रवी कोळी, जिल्हा काँग्रेस कमिटीचे हर्षल कोळी, पप्पू सिंह, माजी महिला काँग्रेस अध्यक्ष वैशाली भोसले, दिवा शहर ब्लॉक अध्यक्ष सुरेश भोईर, अफसर खान, सरफराज पावे, जावेद सय्यद, उत्तम कदम, किरण ताटे, मयूर भगत, सचिन सुतार, जयेश भगत, अनिता यादव आणि उमेश रक्ते यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.संविधानाचे रक्षण, मतदानाच्या अधिकारांची जपणूक, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि पत्रकारितेचे स्वातंत्र्य या मुद्द्यांवर नागरिकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या अभियानातून करण्यात आला. हा जनजागृती मोर्चा शांततेत पार पडला.

# शेतकऱ्यांनी भीक मागून जमवले पाच हजार

## शासनाला मदत देण्याचा प्रयत्न; तहसील प्रशासनाचा स्वीकारण्यास नकार

**हिमायतनगर | वाय.डी.येणेकर**

नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर येथे शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी अनोखे ‘भीक मागो’ आंदोलन करण्यात आले. शासनाकडे निधीची कमतरता असल्याचा उपरोधिक टोला लगावत आंदोलकांनी नागरिकांकडून भीक मागून जमा केलेली पाच हजार रुपयांची रक्कम शासनाला मदत म्हणून देण्याचा प्रयत्न केला. मात्र, तहसील प्रशासनाने ही रक्कम स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यात शासन व प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप करत संघटनेचे पदाधिकारी आणि शेतकरी रस्त्यावर उतरले. त्यांनी नागरिकांकडून वर्गणी गोळा करून पाच हजार रुपये जमा केले. ही रक्कम धनादेशाद्वारे तहसील प्रशासनाकडे सुपूर्द करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी धनादेश स्वीकारण्यास नकार दिला.




शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासनाला जाग आणण्यासाठी हे प्रतीकात्मक आंदोलन केल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध करत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या मराठवाडा प्रभारी तथा महिला अध्यक्षा पूजाताई चव्हाण, तालुकाध्यक्ष रामभाऊ शिरफुले कामारीकर, युवा तालुकाध्यक्ष अंकुश तीगलवाड वीरसणीकर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ओंकार टेकाळे यांची एमबीबीएससाठी निवड

## गंगा सावंगी किनाऱ्याच्या सुपुत्राला राज्य कोट्यातून प्रवेश; परिसरात आनंदाचे वातावरण

**परतूर | राम राठोड**

परतूर तालुक्यातील गंगा सावंगी किनारा येथील ओंकार श्रीकृष्ण टेकाळे यांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरू केली आहे. अहिल्यानगर येथील विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल येथे एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य कोट्यातून तिसऱ्या फेरीत त्यांना प्रवेश मिळाला आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वास आवश्यक असतो. या गुणांच्या बळावर ओंकार यांनी एमबीबीएस प्रवेशाचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांचे यश प्रेरणादायी ठरत आहे.ओंकार यांच्या यशामुळे कुटुंबीयांचा आनंद द्विगुणित झाला असून, नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांकडून त्यांचे कौतुक केले जात आहे. भविष्यात वैद्यकीय शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून त्यांनी रुग्णसेवेच्या माध्यमातून समाजाची सेवा करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.ओंकार श्रीकृष्ण टेकाळे यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.




# परशुराम मुळे यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

## जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेची जबाबदारी साहित्यिक संघटन बळकट करण्याचे आवाहन

**जालना | मुरलीधर डहाके**

जाफराबाद तालुक्यातील चिंचखेडा येथील कवी तथा ग्रामीण साहित्यिक परशुराम मुळे यांची जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या जाफराबाद तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. परिषदेचे जालना जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. शशिकांत पाटील यांनी पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर केली. ग्रामीण भागातील साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे, नवोदित लेखक–कवींना प्रोत्साहन मिळावे आणि साहित्य चळवळीला बळकटी मिळावी, या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.



परिषदेच्या तालुका कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी उत्तमराव कानडजे, सचिवपदी कृष्णकुमार जाधव, तर मार्गदर्शक म्हणून ॲड. विठ्ठलराव काष्टे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जाफराबाद तालुक्यातील साहित्यिकांचे संघटन मजबूत करून साहित्यविषयक उपक्रमांना चालना द्यावी, असे आवाहन नियुक्तिपत्राद्वारे करण्यात आले आहे. या नियुक्तीमुळे तालुक्यातील साहित्य क्षेत्रात नव्या उपक्रमांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# औद्योगिक वापरासाठी जाणारे सोयाबीन कुटार जप्त

## वसमत–मालेगाव मार्गावर दोन पिकअपवर संयुक्त पथकाची कारवाई

**वसमत | शेख एजाज**

पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धता कायम राहावी, यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. वसमत–मालेगाव मार्गावर औद्योगिक वापरासाठी वाहतूक होत असलेले सोयाबीनचे कुटार दोन पिकअप वाहनांतून जप्त करण्यात आले. महसूल, पशुसंवर्धन आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने कारवाई केली.

तहसीलदार सारंग चव्हाण, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. अजय मुस्तरे आणि तालुका कृषी अधिकारी सुनील भिसे यांच्या संयुक्त समितीने मार्गावर तपासणी केली. यावेळी दोन पिकअप वाहनांतून सोयाबीनच्या कुटाराची औद्योगिक वापरासाठी वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पथकाने तत्काळ कारवाई करत संबंधित कुटार जप्त केले.



**चाऱ्याच्या उपलब्धतेसाठी प्रशासन सतर्क**

सोयाबीनचे कुटार पशुधनासाठी महत्त्वाचा चारा असून, ग्रामीण भागातील पशुपालकांची त्यावर मोठ्या प्रमाणात भिस्त असते. चाऱ्याची उपलब्धता कमी होऊ नये आणि पशुपालकांना आवश्यक चारा मिळावा, या उद्देशाने प्रशासनाकडून चारा वाहतूक व वापरावर लक्ष ठेवले जात आहे.

शासनाच्या निर्देशांनुसार चारा व पशुखाद्याची वाहतूक आणि वापर होणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित विभागांकडून नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**संयुक्त पथकाची मोहीम सुरू**

महसूल, पशुसंवर्धन आणि कृषी विभागाच्या समन्वयातून ही कारवाई करण्यात आली. पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध राहावा, यासाठी अशा वाहतुकीवर प्रशासनाकडून यापुढेही देखरेख ठेवली जाणार आहे. त्यामुळे चारा वाहतूकदारांनी शासनाच्या आदेशांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# दिवेकरांच्या पाण्यासाठी मनसेचा एल्गार

## आगासन फाटकावर मीटर बसवून पाणीपुरवठा तपासण्याची प्रकाश पाटील यांची मागणी

**दिवा | अरविंद कोठारी**

ठाणे/दिवा शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनसे नेते प्रकाश पाटील यांनी पालकमंत्री तथा वनमंत्री गणेश नाईक यांची जनता दरबारात भेट घेऊन निवेदन सादर केले. दिवेकरांना पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा मिळावा, यासाठी त्यांनी प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली.

दिवा शहराला प्रत्यक्षात किती पाणी मिळते, हे स्पष्ट होण्यासाठी आगासन फाटक येथे मीटर बसवून पाणीपुरवठ्याची तपासणी करावी, अशी प्रमुख मागणी प्रकाश पाटील यांनी केली. अधिकृत मोजमापातून पाणीपुरवठ्याचे वास्तविक प्रमाण स्पष्ट झाल्यास पाणीटंचाईची कारणे शोधून त्यावर प्रभावी उपाययोजना करता येतील, अशी भूमिका त्यांनी मांडली.तसेच पाणीपुरवठ्यातील अनियमितता दूर करून नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे. पाणी वितरणातील अडथळ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच कथित पाणीमाफियांवरही कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.




पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी दिवेकरांना त्रास सहन करावा लागत असल्याने प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी, असे प्रकाश पाटील यांनी अधोरेखित केले. आता या निवेदनावर प्रशासन काय कार्यवाही करते आणि दिवा शहराच्या पाणीप्रश्नाला कधी दिलासा मिळतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.दिवेकरांच्या हक्काच्या पाण्यासाठी मनसे नेते प्रकाश पाटील यांचा लढा सुरूच!

# माळवट्यातील ११ बायोकोल कारखान्यांना टाळे

## चारा उपलब्धतेसाठी जिल्हा प्रशासनाची कारवाई; पुढील आदेशापर्यंत बंदी

**वसमत | शेख एजाज**

वसमत तालुक्यातील माळवटा एमआयडीसी परिसरातील ११ बायोकोल निर्मिती कारखाने जिल्हा प्रशासनाने बंद करण्याचे आदेश दिले आहेत. १९ ऑक्टोबर रोजी झालेल्या संयुक्त तपासणीत सोयाबीनसह अन्य पिकांच्या अवशेषांचा औद्योगिक वापर होत असल्याचे आढळले. पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली.

**औद्योगिक वापरावर निर्बंध**

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या आदेशानुसार संबंधित विभागांच्या पथकाने कारखान्यांची तपासणी केली. यामध्ये सोयाबीनचा भुसा व कडब्यासह अन्य पिकांच्या अवशेषांचा बायोकोल निर्मितीसाठी वापर होत असल्याचे निदर्शनास आले.



**पुढील आदेशापर्यंत बंदी**

प्रशासनाने संबंधित कारखानदारांना पुढील आदेश मिळेपर्यंत कारखाने सुरू न करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच पिकांच्या अवशेषांची औद्योगिक कारणांसाठी वाहतूक करू नये, अशा सूचनाही कारखानदार आणि वाहनचालकांना देण्यात आल्या आहेत.

**अधिकाऱ्यांचा सहभाग**

या संयुक्त कारवाईत वसमतचे तहसीलदार सारंग चव्हाण, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अजय मुस्तरे, मंडळ अधिकारी श्री. भद्रे आणि महसूल कर्मचारी सहभागी झाले होते. शासनाच्या निर्देशांचे पालन आणि पशुधनासाठी चारा उपलब्ध ठेवण्याच्या दृष्टीने प्रशासनाने ही कारवाई केली आहे.

# रब्बी पेरणीची घाई नको; पाणी जपा!

## १९७२ पेक्षा आजचे जलसंकट वेगळे; घटत्या भूजलपातळीने चिंता वाढली

**सिल्लोड | गजानन काळे**

वृत्त यंदा पावसाने ओढ दिल्याने अनेक भागांत पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता आहे. घटलेली भूजलपातळी, अपुरे पर्जन्यमान आणि जलसाठ्यावरील वाढता ताण पाहता आगामी उन्हाळा आव्हानात्मक ठरू शकतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी रब्बी पेरणीची घाई टाळून पाण्याच्या उपलब्धतेनुसार निर्णय घ्यावा. पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या गरजांना प्राधान्य देत जलसंधारणावर भर देण्याची गरज आहे.

**१९७२ पेक्षा आजचे संकट वेगळे!**

महाराष्ट्राने १९७२ मध्ये भीषण दुष्काळ अनुभवला. त्या काळात विहिरी, विद्युतपंप आणि भूजल उपशाची साधने मर्यादित होती. आज आधुनिक साधनांमुळे भूजलाचा मोठ्या प्रमाणावर उपसा होत असल्याने जलसाठ्यावरील ताण वाढला आहे. अपुरा पाऊस आणि अनियंत्रित पाणी उपसा यामुळे भविष्यातील जलसंकट अधिक गंभीर होण्याची भीती आहे.

**पेरणीपूर्वी पाण्याचा हिशेब करा!**

रब्बी हंगामात पुरेसे पाणी मिळाले नाही, तर शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसू शकतो. बियाणे, खते, मशागत आणि मजुरीवर खर्च केल्यानंतर पाण्याअभावी पीक हातचे जाण्याचा धोका असतो. त्यामुळे जमिनीतील ओलावा, विहिरींची पाणीपातळी आणि सिंचनाची सोय तपासूनच पेरणी करावी.



पाणी अपुरे असल्यास कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांचा पर्याय निवडावा किंवा पेरणी टाळावी.

**पिण्याच्या पाण्याला प्राधान्य!**

दुष्काळाचा परिणाम शेतीबरोबरच नागरिकांचा पाणीपुरवठा, पशुधन आणि दैनंदिन गरजांवरही होऊ शकतो. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. ग्रामपंचायती आणि प्रशासनाने संभाव्य टंचाई लक्षात घेऊन वेळीच उपाययोजना कराव्यात.

**जलसंधारणाशिवाय पर्याय नाही!**

पाण्याचा अपव्यय रोखणे, अनावश्यक भूजल उपसा टाळणे आणि ठिबक व तुषार सिंचनाचा वापर वाढविणे आवश्यक आहे. गावपातळीवर शेततळी, पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरणाच्या कामांना प्राधान्य दिल्यास भविष्यातील टंचाईची तीव्रता कमी होऊ शकते.

**आज पाणी वाचवा, उद्याचे संकट टाळा!**

आज शेतीसाठी पाण्याचा अनियंत्रित वापर झाल्यास उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीसाठी आर्थिक जोखीम पत्करण्यापूर्वी पाण्याचा विचार करावा. शासनानेही उपलब्ध जलसाठ्यांचा आढावा घेऊन टंचाई निवारणाचे नियोजन करावे. पाण्याचा काटकसरीने वापर आणि सामूहिक जलसंधारण हाच संभाव्य जलसंकटाची तीव्रता कमी करण्याचा प्रभावी मार्ग ठरणार आहे.

# चितळी-पुतळीत गुटख्याची मोठी खेप पकडली

## ८३.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त; विशेष पथकाची धडक कारवाई

**जालना | मुरलीधर डहाके**

जालना तालुक्यातील चितळी-पुतळी परिसरात अवैध गुटखा वाहतुकीविरुद्ध जालना पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने धडक कारवाई केली. मौजपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या या कारवाईत गुटख्यासह आयशर वाहन व इतर साहित्य असा एकूण ८३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध गुटखा वाहतुकीविरोधातील पोलिसांच्या मोहिमेला वेग मिळाला आहे.

कारवाईत ५३ लाख रुपये किमतीचा गुटखा, ३० लाख रुपये किमतीचे आयशर वाहन, १० हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि ५ हजार रुपये किमतीचे जीपीएस उपकरण जप्त करण्यात आले.या प्रकरणात जाहिद शोरेन खान (रा. कालीदेवी, जि. झाबुआ, मध्य प्रदेश), सुनील बोराडे (रा. मंठा, जि. जालना) आणि गब्बर सिंग (रा. मध्य प्रदेश,



पूर्ण पत्ता उपलब्ध नाही) यांची नावे समोर आली आहेत.पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने ही कारवाई केली. या मोहिमेत सहायक पोलीस निरीक्षक अविनाश गडाख, सहायक फौजदार दिनेश बर्डे, पोलीस हवालदार सचिन कोकणे, महिला पोलीस कर्मचारी मेघा बोराडे तसेच नंदकिशोर जैवाळ, हरबक, नागवे आणि हाळदे यांनी सहभाग घेतला.अवैध गुटखा वाहतूक व विक्रीला आळा घालण्यासाठी संबंधित यंत्रणांकडून कारवाई सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# नियोजनातून यश साध्य करा!

## वरिष्ठ श्रेणी सुलभक प्रशिक्षणाची सांगता

**सोयगाव | अलका चव्हाण**

प्रभावी नियोजन, वेळेचे योग्य व्यवस्थापन आणि कौशल्यपूर्ण कार्यपद्धतीच्या माध्यमातून यश संपादन करता येते, असे प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता तथा प्रशिक्षण समन्वयक प्रा. डॉ. शिवाजीराव ठाकूर यांनी केले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव येथील ए. टी. झांबरे विद्यालयात १४ ते १७ ऑक्टोबरदरम्यान आयोजित जिल्हास्तरीय वरिष्ठ श्रेणी सुलभक प्रशिक्षणाची सांगता झाली. यावेळी ते बोलत होते.

प्रा. डॉ. शैलेश पाटील यांनी दैनंदिन जीवनातील ताणतणाव व्यवस्थापनाचे महत्त्व विशद केले, तर प्रा. जागृती भोळे आणि प्रा. दीपक पिंगळे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या वतीने सुलभकांचा सन्मान करण्यात आला. सहभागी शिक्षकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.



**दिवाळीनंतर तालुकास्तरीय प्रशिक्षण**

वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी पात्र व नोंदणीकृत शिक्षकांना दिवाळीनंतर दहा दिवसांचे तालुकास्तरीय प्रशिक्षण दिले जाणार आहे. यात पीपीटी, वर्ड, एक्सेल, शैक्षणिक व्हिडिओ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरावर आधारित पाच स्वाध्याय पूर्ण करावे लागतील. प्रशिक्षणाच्या दहाव्या दिवशी ५० गुणांची लेखी परीक्षा होणार आहे.प्रशिक्षणानंतर ४० दिवसांच्या आत स्वाध्यायांसह कृती संशोधन, नवोपक्रम किंवा प्रकल्प यांपैकी एक संशोधनकार्य पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रत्येक तासिकेला ऑनलाइन हजेरी अनिवार्य राहणार आहे.किशोर पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर दीपक चव्हाण यांनी आभार मानले.

# लोणी जुना तांड्यात १२ एकर ऊस जळून खाक

## आगीत लाखोंचे नुकसान; पंचनाम्यानंतर भरपाईची प्रतीक्षा

**पाथरी | रेखा मनेरे**

तालुक्यातील लोणी बुद्रुक येथील लोणी जुना तांडा परिसरात लागलेल्या आगीत १२ एकर ऊस जळून खाक झाला. या दुर्घटनेत चार शेतकऱ्यांचे ऊस पीक आणि सिंचन साहित्याचे नुकसान झाले असून, महसूल प्रशासनाने नुकसानीचा पंचनामा केला आहे.

गट क्रमांक २९२ मधील ऊस पिकाला अचानक आग लागल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. उत्तम शिवाजी पवार यांच्या तुषार सिंचनाच्या पाईपचेही नुकसान झाले. या घटनेत शिवाजी तुकाराम पवार, प्रकाश रामराव पवार, अशोक रामराव पवार आणि रामराव लालू पवार या शेतकऱ्यांना फटका बसला.



शेतकऱ्यांनी ऊस पिकाच्या मशागतीपासून खत, औषधे आणि सिंचनासाठी मोठा खर्च केला होता. पीक जळाल्याने हा खर्च वाया गेला असून, आगामी हंगामाच्या नियोजनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

घटनेनंतर तलाठी शर्मा व मंडळाधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली आणि पंचनामा केला. नुकसान नोंदविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असली, तरी शासनाकडून मदत कधी मिळणार, हा प्रश्न कायम आहे.

नुकसानीची दखल घेऊन शासनाने तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

# पीक कर्जासाठी शेतकरी आक्रमक; २७ पासून उपोषण

## सोसायटी थकबाकीच्या अटीवर आक्षेप; पाथरीत बँक ऑफ महाराष्ट्रला निवेदन

**पाथरी | रेखा मनेरे**

सोसायटीची चालू थकबाकी असल्याचे कारण देत पीक कर्ज नाकारले जात असल्याचा आरोप करत तालुक्यातील शेतकऱ्यांनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या पाथरी शाखेला निवेदन दिले आहे. सर्व शेतकऱ्यांना कोणतीही अट न घालता तातडीने पीक कर्ज द्यावे, अशी मागणी करण्यात आली असून, मागण्या मान्य न झाल्यास २७ ऑक्टोबरपासून बँकेसमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

पाथरी तालुक्यातील कानसूर, अंधापूरी, डाकू पिंपरी, तारूगव्हाण, बाभळगाव, लोणी बु., गुंज खुर्द, गोपेगाव आणि गोंडगाव येथील शेतकऱ्यांनी निवेदनातून आपली व्यथा मांडली आहे. सोसायटीची चालू थकबाकी असल्याचे कारण सांगून बँकेकडून पीक कर्जाचे वितरण केले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

शेतीसाठी आवश्यक असलेला खर्च भागविण्यासाठी पीक कर्ज महत्त्वाचे असताना




कर्ज नाकारल्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. दुष्काळसदृश परिस्थिती आणि शेतीच्या पाण्यासाठी विद्युत पंपांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची नितांत गरज असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना तातडीने पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, सोसायटीच्या चालू थकबाकीची अट रद्द करावी आणि नवीन पीक कर्ज वितरण प्रक्रिया लवकर सुरू करावी, अशा प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांची तातडीने दखल घेऊन पीक कर्ज वाटप सुरू करावे; अन्यथा २७ ऑक्टोबरपासून बँकेसमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती उपजिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय आणि पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन पाथरी यांना देण्यात आल्या आहेत. निवेदनावर संबंधित गावांतील शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ४,२५० रुपये पहिल्या उचलीसाठी रेणुका शुगरमध्ये आंदोलन!

## किसान सभेच्या नेतृत्वाखाली गाळप बंद; शेतकरी गव्हाणीत उतरले

**पाथरी | रेखा मनेरे**

रेणुका शुगर कारखान्याकडून उसाला पहिली उचल ४,२५० रुपये जाहीर करावी, या मागणीसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले. शेतकऱ्यांनी कारखान्याच्या गेटवर निदर्शने करत थेट गव्हाणीत उतरून गाळप बंद पाडले.

आज सकाळपासून कारखान्याच्या गेटवर शेतकऱ्यांनी ठिय्या देत आपल्या मागणीकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. मात्र, कारखानदार चर्चेसाठी पुढे येत नसल्याने शेतकरी आणि किसान सभेचे कार्यकर्ते आक्रमक झाले. त्यांनी थेट गव्हाणीत उतरून गाळप प्रक्रिया बंद केली.

'पहिली उचल ४,२५० रुपये जाहीर करा, अन्यथा कारखाना सुरू होऊ देणार नाही,' असा ठाम इशारा आंदोलक शेतकऱ्यांनी दिला. मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.

या आंदोलनामुळे रेणुका शुगरचे गाळप ठप्प झाले असून, ऊस दराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आंदोलनात मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. आता कारखाना व्यवस्थापन शेतकऱ्यांच्या मागणीवर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



हे वर्तमानपत्र, मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक पंडित दौलतराव तिडके यांनी श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस, गाळा नंबर (१), नगरपंचायत कॉम्प्लेक्स, मेन रोड सेनगाव, ता. सेनगाव, जिल्हा हिंगोली-४३१५४२ येथे छापून कार्यालय, श्रीकृष्ण निवास, शंकर नगर, प्रभाग क्रमांक (७), सेनगाव जिल्हा हिंगोली-४३१५४२ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले, कार्यालय ई-मेल-news.kalamveer@gmail.com

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor **Pandit Daulatrao Tidke** at Shree Krishna Printing Press, Gala No 1, Nagar Panchyat Complex, Main Road, Sengaon, Hingoli 431542 and published at Shree Krishna Niwas, Shankar Nagar, Prabhag No 7, Sengaon, Hingoli-431542 (Maharashtra) E-mail-news.kalamveer@gmail.com, PRGI No. MHMAR/25/A0558